लॉजिस्टिक धोरणास मंजुरी

राज्याला पाच वर्षांत तीस हजार कोटींचे उत्पन्न मिळणे अपेक्षित

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

महाराष्ट्र लॉजिस्टिक धोरण २०२४ या धोरणाला राज्य मंत्रिमंडळाने अखेर बुधवारी मान्यता दिली. हे धोरण अंमलात आणल्यास राज्याला येत्या पाच वर्षांत सुमारे ३० हजार ५७३ कोटींचे उत्पन्न होणार आहे. राज्य आर्थिक सल्लागार परिषदेने केलेल्या शिफारशीनुसार लॉजिस्टिक धोरण तयार करण्यात आले आहे. हे धोरण पुढील १० वर्षांतील विकासाला नजरेसमोर ठेऊन तयार करण्यात आले आहे. या धोरणामुळे राज्यात सुमारे पाच लाख रोजगारनिर्मिती होईल.

- राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत शिक्कामोर्तब
- पाच लाखांची रोजगारनिर्मिती होणार
- १० वर्षांतील विकास नजरेसमोर ठेवून आखणी

चित्र : एआय

सध्याच्या १४-१५ टक्क्यांच्या तुलनेत लॉजिस्टिकचा खर्च किमान ४-५ टक्क्यांनी कमी करणे, लॉजिस्टिकसाठी लागणारा वेळ कमी करणे, विविध उपाययोजनांद्वारे हरित उपक्रम राबवून कार्बन उत्सर्जन कमी करणे, ब्लॉक चेन, कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटलिजन्ट लॉजिस्टिक मॅनेजमेंट सिस्टीमचा वापर, ग्रीन लॉजिस्टिक पार्कचा प्रसार, शाश्वत डिझाइन, मोडल शिफ्ट या बाबी यात समाविष्ट आहेत. या क्षेत्रात देशांतर्गत व विदेशी गुंतवणूक आकर्षित करणे, तसेच महाराष्ट्राला जागतिक दर्जाचे लॉजिस्टिक केंद्र हा दर्जा मिळवण्याचा प्रयत्न असेल. हे धोरण तयार करतांना महाराष्ट्र मेरिटाइम बोर्ड, जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण, मुंबई पोर्ट ट्रस्ट, राज्य रस्ते विकास महामंडळ, एमएमआरडीए, सिडको, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांचा सहभाग घेण्यात आला आहे.

या धोरणांतर्गत २०२९ पर्यंत १० हजार एकरहून अधिक क्षेत्रावर समर्पित लॉजिस्टिक पायाभूत सुविधा विकसित करण्यात येतील. यात आंतरराष्ट्रीय मेगा लॉजिस्टिक हब म्हणून पनवेल येथील नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळाशी संलग्न नवी मुंबई-पुणे क्षेत्रात २ हजार एकरवर इंटरनॅशनल मेगा लॉजिस्टिक केंद्राचा विकसित करण्यात येईल. त्याच्याशी नवी मुंबई ते पुणे हे क्षेत्र तळोजा, पाताळगंगा, रसायनी, खोपोली, महाड, रोहा, चाकण, तळेगांव या औद्योगिक वसाहती संलग्न असल्यामुळे हे क्षेत्र आंतराष्ट्रीय स्तरावरील व्यापार व उद्योगांचे प्रमुख केंद्र होईल.

राष्ट्रीय लॉजिस्टिक केंद्र

नागपूर- वर्धा नॅशनल मेगा लॉजिस्टिक हब हे पंधराशे एकरवर उभारण्यात येईल. हे केंद्र हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाशी जोडले असून, नागपूर जिल्ह्याच्या वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक केंद्रीय स्थानामुळे लॉजिस्टिक केंद्राच्या विकासासाठी अनुकूल आहे. जिल्ह्यात ४ राष्ट्रीय द्रुतगती मार्ग आणि एक समर्पित मालवहतूक कॉरिडॉर प्रगतीपथावर असून जिल्हा पूर्वीपासून मालवाहतूक करण्याचे प्रमुख केंद्र म्हणून ओळखला गेला आहे. या केंद्रासाठीही पंधराशे कोटी रुपयांची तरतूद करण्यात येईल.

राज्य लॉजिस्टिक केंद्र

छत्रपती संभाजी नगर-जालना, ठाणे-भिवंडी, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, पुणे-पुरंदर व पालघर-वाढवण या पाच ठिकाणी प्रत्येकी ५०० एकरवर राज्य लॉजिस्टिक केंद्रे लॉजिस्टिक सुविधा उपलब्ध करतील. या पाच हबसाठी २ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात येईल.

'जागावाटपात नमते घेऊ नये!'

सौरभ शर्मा
Sourabh.sharma@timesofindia.com

मुंबई : लोकसभा निवडणुकीत झालेल्या जागावाटपात अपेक्षित जागा न मिळाल्याने विधानसभा निवडणुकीत ही पुनरावृत्ती टाळण्यासाठी काँग्रेसने आतापासूनच सावध पवित्रा घेतला आहे. त्यानुसार पक्षाने जागावाटपाच्या चर्चेत नमती भूमिका घेऊ नये, अशी सूचना वरिष्ठ नेत्यांकडून केली जात आहे. जागावाटप निश्चित करताना तिन्ही पक्षांच्या कामगिरीचा विचार करण्याची मागणी या नेत्यांकडून होत असल्याचे सूत्रांनी सांगितले. विशेष म्हणजे, आगामी निवडणुकीत काँग्रेसच्या वाट्याला येणाऱ्या जागांनुसार प्रचाराची रणनीती ठरणार असल्याचे पक्षातील एका ज्येष्ठ नेत्याने 'महाराष्ट्र टाइम्स'ला सांगितले.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीची विशेष बैठक बुधवारी मुंबईत आयोजित करण्यात आली होती. तत्पूर्वी, काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांची बैठक झाली. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला मिळालेले यश महत्त्वाचे असून, जागावाटप निश्चित करताना त्यानुसारच निर्णय घेण्याची मागणी यावेळी अनेकांकडून करण्यात आली, तर या निवडणुकीतही दलित आणि अल्पसंख्याक मतांवर लक्ष केंद्रीत करण्याची सूचना पुढे आली. ज्यांची कामगिरी सरस त्यांचा मुख्यमंत्री हे धोरण असावे, अशी मागणीही अनेक नेत्यांकडून करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

लोकसभा निवडणुकीदरम्यान सत्ताधाऱ्यांवर टीका करताना '५० खोके, एकदम ओके' हा प्रचाराचा मुद्दा बनवण्यात आला होता. विधानसभा निवडणुकीत त्याची पुनरावृत्ती करतानाच, शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांविरोधात लढत असलेल्या मतदारसंघांत त्यानुसार प्रचार करण्याची सूचना दिल्लीतील ज्येष्ठ नेत्यांकडून देण्यात आली आहे. याशिवाय महागाई, शेतकरी आणि बेरोजगारीच्या मुद्द्यांवरही प्रचारात भर दिला जाणार आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी वरिष्ठ काँग्रेस नेत्यांची भूमिका

- तिन्ही पक्षांच्या कामगिरीचा विचार करण्याची मागणी
- मिळणाऱ्या जागांनुसार ठरणार प्रचाराची रणनीती

जागा निश्चित झाल्यानंतर प्रचार

विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाच्या वाट्याला किती जागा येतात, हे निश्चित झाल्यानंतर प्रचाराची रणनीती ठरवली जाणार आहे. सध्या पक्षाला १२०च्या आसपास जागा मिळतील असे गृहित धरून त्यानुसार प्रचाराची रणनीती ठरवली जात आहे. मात्र त्याहून कमी जागा मिळाल्यास यात बदल अपेक्षित असल्याचे पक्षातील एका वरिष्ठ नेत्याने सांगितले.

जातवैधता प्रमाणपत्र मिळवण्यातील अडचणी दूर

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

अनुसूचित जाती व जमातींच्या जातवैधता प्रमाणपत्र मिळण्यातील अडचणी दूर करण्यासाठीच्या महत्त्वपूर्ण निर्णयाला महायुती सरकारने हिरवा कंदील दर्शविला आहे. महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र मिळण्यास येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियम २०००मध्ये सुधारणा करण्याच्या निर्णयास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

संबंधित नियमांमध्ये होणार सुधारणा

चुकीच्या नोंदीच्या आधारे वैधता प्रमाणपत्र देण्यात आल्याचे दिसून आल्यास अशा प्रकरणात प्रमाणपत्राची पुन्हा पडताळणी करण्याची तरतूद नसल्याने हे प्रमाणपत्र रद्द करण्यात अडचणी येतात. त्यामुळे वैधता प्रमाणपत्राचे पुनर्विलोकन या समितीमार्फत करण्याची तरतूद करण्यात येईल.

कागल येथे आयुर्वेद महाविद्यालय

कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे आयुर्वेद महाविद्यालय आणि आजरा तालुक्यातील उत्तूर येथे योग व निसर्गोपचार महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत या निर्णयाला मान्यता देण्यात आली.

आदिवासी हिरडा औद्योगिक सहकारी संस्थेला अर्थसाह्य

औषधी वनस्पती प्रक्रिया आदिवासी सहकारी संस्थांसाठी अर्थसाह्य योजनेतून जुन्नरच्या श्री कुकडेश्वर आदिवासी हिरडा औद्योगिक सहकारी संस्थेस अर्थसाह्य करण्याचा निर्णय घेण्यात आला. या संस्थेस एका वेळेचे अर्थसाह्य म्हणून दोन कोटी रुपये देण्यात येतील.

दोन संस्थांचे मुद्रांक शुल्क माफ

सेना कल्याण शैक्षणिक संस्था आणि राधा कल्याणदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्टला मुद्रांक शुल्कात १०० टक्के सवलत देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील कान्हे येथील राधा कल्याणदास दर्यानानी चॅरिटेबल ट्रस्टला तसेच आर्मी वेल्फेअर एज्युकेशन सोसायटीला याचा लाभ होईल.

वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पास मान्यता

महत्त्वाकांक्षी वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पास या बैठकीत मान्यता देण्यात आली. ८७ हजार ३४२ कोटी ८६ लाख रुपयांच्या या प्रकल्पामुळे पावणेचार लाख हेक्टर क्षेत्राचे सिंचन होणार आहे.

न्यायमूर्तींना विविध सुविधा

न्यायमूर्तींना सेवा निवृत्तीनंतर घरकामगार, चालकसेवा असे सेवानिवृत्तीनंतरचे लाभ देण्याचा निर्णयही घेण्यात आला. मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त मुख्य न्यायमूर्ती आणि अन्य न्यायमूर्ती यांना किंवा मृत्यूपश्चात त्यांच्या पती किंवा पत्नीस हे लाभ देण्यात येतात. हे लाभ मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून नियुक्त झालेल्या परंतु इतर राज्याच्या उच्च न्यायालयातून सेवानिवृत्त झालेल्या किंवा मृत्यूपश्चात त्यांच्या जिवंत पती किंवा पत्नीस देण्यास बुधवारी मान्यता देण्यात आली.

'शिंदे यांचा रेकॉर्ड तुटणे कठीण!'

'योद्धा कर्मयोगी'च्या प्रकाशनावेळी फडणवीस यांचे प्रतिपादन

म. टा. खास प्रतिनिधी, ठाणे

'राजकारणामध्ये प्रत्येक नेत्याचे वेगवेगळे रेकॉर्ड होत असले, तरी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेला रेकॉर्ड तुटणे कठीण आहे. सत्तापक्षातून बाहेर पडायचे, विरोधी पक्षाबरोबर जायचे आणि मग सरकार स्थापन करायचे ही हिंमत त्यांनी दाखवली. हीच हिंमत खऱ्या अर्थाने त्यांना या पुस्तकाचे नायक बनवते,' असे मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'योद्धा कर्मयोगी' पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात व्यक्त केले.

मुख्यमंत्री शिंदे यांचा जीवनपट उलगडणाऱ्या प्रा. डॉ. प्रदीप ढवळ आणि डॉ. अरुंधती भालेराव, राजन बने व सान्वी ओकलिखित 'योद्धा कर्मयोगी' पुस्तकाचे प्रकाशन बुधवारी ठाण्यातील गडकरी रंगायतनमध्ये राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे तसेच पद्मश्री शंकरबाबा पापळकर, ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक, साहित्य संमेलनाध्यक्ष रवींद्र शोभणे यांच्यासह मंत्री, आमदार आणि खासदार उपस्थित होते.

'योद्धा कर्मयोगी हे पुस्तक माझा शेवट नाही. हा तर माझ्या आयुष्याचा केवळ ट्रेलर आहे. चित्रपट अजून बाकी आहे,' असे सांगत मुख्यमंत्री शिंदे यांनी कार्यकर्त्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. '१०० टक्के निष्ठा आणि २०० टक्के विश्वास ठेवणाऱ्या कार्यकर्त्यांमुळेच एकनाथ शिंदे तयार झाला आहे. प्रत्येक काम प्रामाणिकपणे केले, तसेच प्रत्येक गोष्ट समाजाचा विचार करून केली,' असे ते म्हणाले.

'राजकारणामध्ये एकनाथ शिंदे २००४ मध्ये, तर देवेंद्र फडणवीस १९९९मध्ये आले. मी १९९०साली आलो असून या दोघांनाही सिनीअर आहे. पण ते दोघे पुढे गेले आणि मी मात्र मागे राहिलो. ४० आमदार आणल्यानंतर मुख्यमंत्री करणार हे माहीत असते, तर अख्खा पक्षच घेऊन आलो असतो,' असे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाषणात जोरदार टोलेबाजी केली.

गणेश जाधव

'शिंदे यांचे आयुष्य अमिताभप्रमाणे'

'शिंदे यांचे आयुष्य अमिताभ बच्चन यांच्याप्रमाणे आहे. बच्चन यांचे 'दिवार' चित्रपटामध्ये वेगळे रूप दिसले, त्यानंतर 'जंजीर'मधून त्यांनी वेगळे रूप दाखवले,' असे राज्यपाल सी पी. राधाकृष्णन म्हणाले. 'छत्रपती शिवाजी महाराजांमुळेच आपली संस्कृती टिकून आहे. भारतीय लोकशाही सर्वात शक्तिशाली आहे,' असे मत त्यांनी व्यक्त केले.

नीतेश राणेंविरोधात अजामीनपात्र वॉरंट

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांच्याविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करून मानहानी केल्याच्या आरोपाखालील खटल्यात वारंवार गैरहजर राहत असल्याबद्दल प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाने भाजपचे आमदार नीतेश राणे यांच्याविरोधात अजामीनपात्र वॉरंट प्रसृत केले आहे. तसेच त्यांना १७ ऑक्टोबर रोजी न्यायालयात हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत.

गेल्या वर्षी मेमध्ये राऊत यांच्यावर टीका करताना नीतेश यांनी त्यांना 'साप' म्हणून संबोधले होते. तसेच राऊत हे उद्धव ठाकरे यांचा विश्वासघात करून १० जूनपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करतील, असा दावाही त्यांनी केला होता. त्यानंतर मानहानी केल्याबद्दल राऊत यांनी नीतेश यांच्याविरोधात न्यायालयात तक्रार दाखल केली. यापूर्वी जानेवारीमध्ये न्यायालयाने नितेश यांच्याविरोधात अजामीनपात्र वॉरंट काढले होते. त्यानंतर २६ फेब्रुवारी रोजी न्यायालयात हजेरी लावल्याने न्यायालयाने ते वॉरंट रद्द केले होते.

'कोल्हापूर बंधाऱ्यांची साठवणक्षमता वाढवा'

अजित पवार यांची सूचना

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

'राज्यातील जनतेला पिण्यासाठी आणि शेतकऱ्यांना सिंचनासाठी पुरेसे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी अस्तित्वातील प्रकल्पांची क्षमतावाढ करणे गरजेचे आहे. नैसर्गिक स्रोतांचा वापर करून एका प्रकल्पातील अतिरिक्त पाणी दुसऱ्या प्रकल्पात नेण्याचे नियोजन करावे, त्यातून सिंचन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ होईल. त्यादृष्टीने आवश्यक ठिकाणी कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे रूपांतर बॅरेजमध्ये करून पाणी साठवणक्षमतेत वाढ करण्याची कार्यवाही गतीने करावी,' असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी दिले.

सोलापूर, कोल्हापूर, हिंगोली, बीड या जिल्ह्यांतील जलसंपदा विभागाशी संबंधित विविध प्रलंबित योजनांसंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. 'काही मध्यम सिंचन प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरत नसल्याने उन्हाळ्यात पाण्याची कमतरता भासते, तर काही प्रकल्पांची दुरुस्ती आवश्यक आहे. उन्हाळ्यामध्ये पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी जलसंपदा विभागाने वित्त विभागाशी समन्वय ठेवून कार्यवाही करावी,' अशी सूचना पवार यांनी केली.

चला मंडळी सणासुदीच्या दिवसात ट्युलिप सोबतच्या सहलींचा शुभारंभ करुया

ट्युलिप हॉलिडेज
सहलोत्सव
www.tulipholidays.in

भारतीय सहली

- राजस्थान मेवाड (7 दिवस)
- राजस्थान मारवाड (6 दिवस)
- अमृतसर धरमशाला डलहौसी पालमपूर (7 दिवस)
- स्टॅच्यु ऑफ युनिटी (3 दिवस)
- सिक्कीम दार्जिलिंग (7 दिवस)
- आसाम मेघालय (8 दिवस) | इंदोर उज्जैन मांडू (5 दिवस)
- अयोध्या वाराणसी प्रयागराज (6 दिवस)
- केरळ (8 दिवस) | कूर्ग ऊटी म्हैसूर (७ दिवस)
- बेस्ट ऑफ अंदमान (7 दिवस)

परदेशी सहली

- स्कँडिनेव्हिया-नॉर्दन लाइटस् (8 दिवस) (२० फेब्रुवारी २०२५)
- ऑस्ट्रेलिया न्यूझीलंड (१६ दिवस)
- बेस्ट ऑफ जपान (8 दिवस)
- जपान चेरी ब्लॉसम स्पेशल (9 दिवस) (26 मार्च 2025)
- व्हायब्रन्ट व्हिएतनाम (10 दिवस)
- सिंगापुर थायलंड मलेशिया (11 दिवस) (20 सप्टेंबर 2024 काहीच जागा शिल्लक)
- मार्वलस मॉरिशस (6 दिवस) | दुबई अबू धाबी (6 दिवस)
- नेपाळ चितवन पोखरा काठमांडू (8 दिवस)
- लुम्बिनी चितवन पोखरा काठमांडू (8 दिवस)
- बेस्ट ऑफ अझरबायजान (8 दिवस) (15 नोव्हेंबर 2024)

☎ : 022-25340909 / 35615645 / 9158508922 / 9821896266
www.tulipholidays.in / info@tulipholidays.in *अटी लागू

राष्ट्रवादी शप काढणार शिवस्वराज्य यात्रा

विद्याधर राणे

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानेही ९ ऑगस्टपासून शिवस्वराज्य यात्रा काढण्याची घोषणा बुधवारी केली. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यात्रेचे नेतृत्व करणार आहेत. किल्ले रायगड येथून या यात्रेची सुरुवात होणार आहे.

बुधवारी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी या यात्रेची घोषणा केली. यावेळी यात्रेचा टिझर व लोगोही प्रसिद्ध करण्यात आला. पहिल्या टप्प्यात १० दिवसांत ही यात्रा महाराष्ट्रातील पुणे, अहमदनगर, सोलापूर, जालना, लातूर, बीड, नांदेड या सात जिल्ह्यांतून फिरणार आहे.

'महायुतीचे सरकार आल्यापासून राज्य अधोगतीकडे चालले आहे. राज्यातील कायदा-सुव्यवस्था बिघडली आहे. शेजारचे राज्य आपल्या तरुणांच्या हातचे काम हिसकावून घेत आहे. राज्यकर्ते मात्र हतबल आहेत. त्यामुळे आम्ही महायुती सरकारचे काळे कारनामे घेऊन जनतेच्या दरबारात जाणार आहोत,' असे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले. 'लोकसभा निवडणुकीत जनतेने केंद्र व राज्य सरकारबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. राज्यातील ४८ पैकी ३१ जागांवर महाविकास आघाडीचा विजय झाला. त्यामुळे सरकार घाबरून योजनांचा भडिमार करत आहे. सरकार ज्या घोषणा करत आहे त्या जनतेलाही पटत नाहीत,' असा दावा पाटील यांनी केला.

Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई ४०० ०२१
दूरध्वनी: +९१-२२-३५५५ ५००० • फॅक्स: +९१-२२-२२०४ २२६८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

कंपनीच्या सदस्यांसाठी सूचना

सत्तेचाळीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा (आयपीओ-पश्चात) आणि ई-मतदानासंबंधी माहिती

कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने आणि सिक्युरिटीज अँण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया यांनी जारी केलेल्या परिपत्रकांची पूर्तता करत असताना, **गुरुवार, दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी भाप्रवेळ दुपारी २:०० वाजता** व्हिडिओ कॉन्फरान्सिंग (**''व्हीसी''**)/इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमां (**''ओएव्हीएम''**) द्वारे होणाऱ्या कंपनीच्या सत्तेचाळीसाव्या (आयपीओ-पश्चात) वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना (**''एजीएम''**), आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ चे स्वतंत्र व एकत्रित लेखापरीक्षित वित्तीय विवरण, त्याचप्रमाणे संचालक मंडळाचा अहवाल, लेखापरीक्षकांचा अहवाल व त्यासोबत जोडण्याची आवश्यकता असलेले इतर दस्तऐवज, कंपनीच्या सदस्यांना **७ ऑगस्ट, २०२४** रोजी, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पाठविण्यात आले आहेत. एजीएमची सूचना आणि वर नमूद करण्यात आलेले दस्तऐवज कंपनीच्या वेबसाईटवर **www.ril.com** येथे आणि स्टॉक एक्सचेंज म्हणजे बीएसई लिमिटेड (**''बीएसई''**) आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया (**''एनएसई''**) यांच्या वेबसाईटसवर अनुक्रमे **www.bseindia.com** येथे आणि **www.nseindia.com** येथे व कंपनीचे रजिस्ट्रार व ट्रान्सफर एजंट, केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड (**''केफिनटेक''**) यांच्या वेबसाईटवर **https://evoting.kfintech.com** येथे उपलब्ध आहेत.

एजीएमची सूचना प्रसारित करण्याच्या तारखेपासून एजीएमच्या सूचनेत नमूद करण्यात आलेले दस्तऐवज सदस्यांच्या तपासणीसाठी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने उपलब्ध आहेत. ज्या सदस्यांना सदर दस्तऐवज तपासून पहायचे असतील त्यांनी त्यांचा/तिचा/त्यांचा फोलिओ क्रमांक/डीपी आयडी आणि क्लायन्ट आयडी नमूद करून **rilagm@ril.com** येथे ई-मेल पाठवावे.

दूरस्थ ई-मतदान आणि एजीएमच्या दरम्यान ई-मतदान:

कंपनी आपल्या सदस्यांना एजीएममध्ये मंजूर करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या ठरावांवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने (**''ई-मतदान''**) मतदान करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देत आहे. सदस्य येथे खाली नमूद करण्यात आलेल्या तारखांना दूरस्थ पद्धतीने मतदान करू शकतील (**''दूरस्थ ई-मतदान''**). कंपनीने ई-मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केफिनटेक यांच्या सेवा घेतल्या आहेत.

डिमटिरिअलाईज्ड स्वरूपात, छापील स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या आणि ज्यांनी त्यांचे ई-मेलचे पत्ते नोंदविले नाहीत, अशा सदस्यांसाठी दूरस्थ मतदान पद्धतीने मतदान करण्यासह, मतदानाशी संबंधित माहिती आणि सूचना एजीएमच्या सूचनेत देण्यात आल्या आहेत. (अ) एजीएमची सूचना पाठविण्यात आल्यानंतर कंपनीची सदस्य बनलेल्या आणि कट-ऑफ तारखेला (येथे नमूद करण्यात आली आहे) समभाग धारण करणाऱ्या व्यक्ती; (ब) युजर आयडी आणि पासवर्ड विसरलेले सदस्य, यांनी कोणत्या पद्धतीने युजर आयडी आणि पासवर्ड मिळवावे/तयार करावे हे एजीएमच्या सूचनेत नमूद करण्यात आले आहे.

दूरस्थ ई-मतदान सुविधा खालील मतदान कालावधीत उपलब्ध असेल:

दूरस्थ ई-मतदान सुरू होण्याची वेळ : **शनिवार, दिनांक २४ ऑगस्ट, २०२४ रोजी भाप्रवेळ दुपारी ०१:०० वाजता**
दूरस्थ ई-मतदान संपण्याची वेळ : **बुधवार, दिनांक २८ ऑगस्ट, २०२४ रोजी भाप्रवेळ सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत**

वरील तारीख व वेळेनंतर दूरस्थ ई-मतदान करण्याची परवानगी दिली जाणार नाही आणि केफिनटेक द्वारा वरील कालावधी संपल्यानंतर दूरस्थ ई-मतदान मॉड्यूल बंद करण्यात येईल.

ज्यांनी दूरस्थ ई-मतदान पद्धतीने मतदान केलेले नाही असे एजीएमला उपस्थित असलेले सदस्य एजीएममध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान (**''इन्स्टा पोल''**) करू शकतील.

गुरुवार, दिनांक २२ ऑगस्ट, २०२४ रोजी अंतिम मुदतीच्या तारखेला डिपॉझिटरी यांनी ठेवलेल्या सदस्यांचे रजिस्टर/लाभधारक मालकांच्या रजिस्टर मध्ये ज्यांचे नाव नोंदविण्यात आले असेल अशी व्यक्तीच फक्त दुरुस्थ ई-मतदान सुविधेचा लाभ घेऊ शकतील किंवा वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होऊ शकतील आणि इन्स्टा पोलद्वारे मतदान करू शकतील.

ई-मेलचा पत्ता नोंदवण्याची/सुधारणा करण्याची पद्धती:

अ) छापील स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या सदस्यांना, ज्यांनी कंपनीकडे त्यांच्या ई-मेल पत्त्याची नोंदणी/सुधारणा केली नाही त्यांनी आवश्यक पूरक दस्तऐवजांसह योग्य प्रकारे भरलेले आणि स्वाक्षरी केलेले प्रपत्र आयएसआर-१ (जे कंपनीच्या वेबसाईटवर **www.ril.com** येथे उपलब्ध आहे) केफिनटेक रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांना सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१-३२, गचीबॉवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानक्रमगुडा, हैदराबाद ५०० ०३२, येथे सादर करून त्यांच्या ई-मेल पत्त्याची नोंदणी/सुधारणा करण्याची विनंती करण्यात येत आहे.

ब) ज्यांनी अजून डिपॉझिटरी सहभागी यांच्याकडे त्यांच्या ई-मेल पत्त्याची नोंदणी/सुधारणा केली नाही अशा डिमटिरिअलाईज्ड स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या सदस्यांना डिपॉझिटरी सहभागींकडे त्यांच्या ई-मेल पत्त्याची नोंदणी/सुधारणा करण्याची विनंती करण्यात येत आहे.

ई-मतदानासंबंधी काही शंका असल्यास, सदस्यांनी केफिनटेकची वेबसाईट: **https://evoting.kfintech.com** येथे ई-मतदानासाठी उपलब्ध असलेल्या ''डाऊनलोडस'' भागात ड्रॉपडाऊन द्वारा उपलब्ध असलेला ''हेल्प'' आणि ''एफएक्यू'' भाग/ई-मतदान वापरण्याविषयी माहिती पुस्तक पहावे.

ई-मतदानासंबंधी काही चौकशी/तक्रार असल्यास, सदस्यांनी खालील संपर्काच्या तपशीलाची नोंद घेण्याची विनंती करण्यात येत आहे:

श्री. व्ही. बालाक्रिष्णन, उपाध्यक्ष
केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड, यूनिट: रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड
सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१-३२, गचीबॉवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट,
नानाक्रमगुडा, हैदराबाद ५०० ०३२
ई-मेल: **evoting.ril@kfintech.com**
टोल फ्री क्रमांक: १८०० ३०९ ४००१ (सर्व कामकाजाचे दिवशी सकाळी ९:०० (भाप्रवेळ) ते सायंकाळी ६:०० (भाप्रवेळ) पर्यंत)

व्हीसी/ओएव्हीएम द्वारा एजीएममध्ये सहभागी होणे:

सदस्य जिओमिट द्वारा https://jiomeet.jio.com/rilagm येथे व्हीसी/ओएव्हीएम द्वारा एजीएमला उपस्थित राहू शकतील. येथे वापरण्याची लॉगइनची माहिती आणि एजीएमला उपस्थित राहण्याचे टप्पे यासंबंधी माहिती एजीएमच्या सूचनेत टिप क्र.९ मध्ये देण्यात आली आहे. ज्यांनी दूरस्थ ई-मतदान पद्धतीने मतदान केले आहे असे सदस्य एजीएमला उपस्थित राहू शकतील परंतु पुन्हा एजीएममध्ये त्यांचे मतदान करण्यास पात्र नसतील.

संचालक मंडळाच्या आदेशाने
स्वाक्षरी/-
सावित्री पारेख
कंपनी सेक्रेटरी आणि
कंप्लायन्स ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : ८ ऑगस्ट, २०२४

www.ril.com